# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

**बदलत्या काळानुरुप समाजोपयोगी शिक्षण मिळाव - कुलगुरू**
**विद्यापीठात पंचवार्षिक बृहत आराखडा कार्यशाळा यशस्वी**

अमरावती.

भारतीय शिक्षण पध्दतीत मध्यंतरीच्या काळात अनेक आमुलाग्र बदल झालेत. जागतिकीकरणाच्या आजच्या काळात नवनवीन गोष्टींचा समावेश शिक्षण पध्दतीत होण्याची गरज आहे. तंत्रज्ञानात सातत्याने बदल होत आहेत. शिक्षण क्षेत्राकडूनही समाजाच्या अपेक्षा पूर्वी पेक्षा अनेक पटींनी वाढल्या आहेत. त्यामुळे आपल्या विद्यार्थ्यांना बदलत्या काळानुरुप समाजोपयोगी शिक्षण मिळायला हवे. विद्यार्थ्याला हवे असलेले शिक्षण मिळावे, यासाठी पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करावयाचा असून आयोजित कार्यशाळा त्यादृष्टिने मैलाचा दगड ठरेल असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. २०१९-२० ते २०२३-२४ असा पाच वर्षीय शैक्षणिक बृहत आराखडा तयार करण्यासाठी विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात कार्यशाळा संपन्न झाली, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, राज्यशासनाचे प्रतिनिधी शिक्षणतज्ज्ञ प्रा. आनंद मापूसकर, प्रा. मिलिंद सोहनी, डॉ.बी.एन. जगताप, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, उपकुलसचिव(मवि) डॉ.सौ. सुलभा पाटील उपस्थित होते.

कुलगुरु म्हणाले, विद्यापीठाचे पुढच्या पाच वर्षाचे शिक्षण कसे राहील, यासाठी महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये बृहत आराखड्यासंदर्भात कार्यशाळांचे आयोजन होत असून त्यावरुन राज्याचा शैक्षणिक बृहत आराखडा तयार होणार आहे. पूर्वी व्यक्तीकेंद्रीत शैक्षणिक प्रवास होता; पण आता समाजामध्ये शैक्षणिक जागृती झाली आहे. समाजाच्या शैक्षणिक अपेक्षा वाढल्या आहेत. पारंपारिक शिक्षण पदवी नोकरीसाठी पुरेशी नाही, यासाठी पारंपारिक शिक्षणपद्धती बरोबरच पारंपारिक माईंडसेट बदलण्याची गरज आहे. येणाऱ्या काळात अप्लाईड पार्टचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची गरज असण्यावर भर देवून विद्यापीठात राष्ट्रीय ज्ञानस्त्रोत केंद्र, स्कील सेंटर, ट्रायबल प्रोजेक्ट, बांबू प्रशिक्षण केंद्र सुरु होणार असल्याची माहिती दिली.

राज्यशासनाचे प्रतिनिधी शिक्षणतज्ज्ञ प्रा. आनंद मापुसकर म्हणाले, डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालानुसार येणाऱ्या पाच वर्षासाठी सर्वकष बृहत आराखडा तयार करावयाचा आहे. ज्यामध्ये सामाजिक, आर्थिक बाबींचा विचार, रोजगाराच्या संधी, उद्योगाची गरज, सहभाग वृद्धी, क्षेत्रीय संतुलन, महिला सबलीकरण, दर्जात्मक सुधारणा, संशोधनाचा दर्जा, सूक्ष्मदर्शी धोरणे, प्रवेश क्षमता, रिक्त जागा, दोन महाविद्यालयांतील अंतर, कृषी, औद्योगिक, व्यावसायिक वैशिष्ट्ये यांसह

इतर बाबींचा समावेश आहे. पुढे म्हणाले, संशोधनाचा समाजाला उपयोग झाला पाहिजे, शैक्षणिक गुणवत्ता वाढली पाहिजे. शिक्षणाचा प्रसार दुर्गम भागामध्ये व्हावा, यासाठी सॅटेलाईट सेंटर सुद्धा सुरु होण्याची गरज आहे. नॅकचे मूल्यांकन करण्यासाठी शासन प्रोत्साहन देत असून प्रत्येक महाविद्यालयाने नॅक करणे महत्वाचे आहे. शैक्षणिक अंकेक्षणाबाबत कुलपतींचा आग्रह आहे. प्रशिक्षण, स्टार्टअप महत्वाचा विषय असून विद्यापीठात इन्क्युबेशन सेंटर सुरु करण्यासाठी पाच कोटी रुपये मिळणार असल्याची त्यांनी माहिती दिली. डॉ. मिलींद सोहनी यांनी पाणी नियोजनावर तर डॉ.बी.एन. जगताप यांनी बृहत आराखडा तयार करण्यासंदर्भात माहिती दिली. प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांनी प्रास्ताविकेतून आपले मनोगत व्यक्त केले.

विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलन पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. पुस्तक देवून पाहुण्यांचे स्वागत कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले. संचालन उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी, तर आभार डॉ. रामसिंह येवतीकर यांनी मानले. यावेळी डॉ.ए.बी. मराठे, डॉ. डाबरे, डॉ.पी.जी. रोहणकर, डॉ. हेमंत देशमुख, डॉ. दिपक धोटे, डॉ. राजीव सदन, डॉ. अजय लाड, डॉ. महेंद्र मेटे, डॉ. संतोष सदार, श्री विजय राऊत आदींनी प्रश्न मांडलेत. त्यावर समर्पक उत्तरे देवून लिखीत सूचना शासनाला कळविण्याचे आवाहन प्रा. आनंद मापुसकर यांनी केले. कार्यशाळेला व्य.प. सदस्य प्रा. दिनेश सूर्यवंशी, सर्व विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, डॉ.डी.डब्ल्यु. निचत, डॉ. मनिषा काळे, डॉ. स्मिता देशमुख, विद्यापीठ प्राधिकारिणींचे सदस्य, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाचे विभागप्रमुख, शिक्षणतज्ज्ञ आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळा आयोजनासाठी महाविद्यालयीन विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतलेत.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १८/०५/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी